# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

# Savitribai Phule Pune University

(Formerly University of Pune)

**अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**
गणेशखिंड, पुणे – ४११००७
दूरध्वनी क्रमांक: ०२०-२५६२१०४५/८/९/५१
ई-मेल: iqac@unipune.ac.in
संकेतस्थळ: www.unipune.ac.in

**Internal Quality Assurance Cell**
Ganeshkhind, Pune – 411007
Contact No.: 020-25621045/8/9/51
E-mail: iqac@unipune.ac.in
Website: www.unipune.ac.in


अंगुहक/२०२६/६८०　　　　　　　　　　　　　　　　　　दिनांक : ८ ऑगस्ट, २०२६

**प्रति,**
**मा. प्राचार्य / संचालक / विभागप्रमुख,**
सर्व संलग्न महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था व विद्यापीठ विभाग
प्रस्तुत विद्यापीठ

**विषय : शैक्षणिक व संशोधन समन्वयक (Academic Research Coordinator – ARC) यांच्यासाठी एकदिवसीय कार्यशाळेच्या आयोजनाबाबत.**

**महोदय / महोदया,**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षामार्फत विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पुणे, अहिल्यानगर, नाशिक व दादरा आणि नगर हवेली जिल्ह्यातील सर्व विद्यापीठ विभाग, संलग्न महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांमधील **शैक्षणिक व संशोधन समन्वयक (Academic Research Coordinator – ARC)** यांच्यासाठी **शुक्रवार, दिनांक १४ ऑगस्ट, २०२६ रोजी सकाळी १०.०० वा.** इरावती कर्वे संकुलातील **धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज सभागृहामध्ये** एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यशाळेमध्ये **'आविष्कार' संशोधन स्पर्धा २०२६–२७, अन्वेषण (AIU Student Research Convention), विद्यापीठाच्या विविध संशोधन योजना, संशोधन प्रकल्पांची प्रक्रिया व मूल्यमापन निकष, ऑनलाइन नोंदणी प्रक्रिया तसेच संशोधन संस्कृती वृद्धिंगत करण्यासंदर्भातील विविध बाबींवर** सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच ARC यांच्या शंका-निरसनासाठी स्वतंत्र संवाद सत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने, आपल्या महाविद्यालय / परिसंस्था / विभागामध्ये नियुक्त असलेल्या **शैक्षणिक व संशोधन समन्वयक (ARC) यांनी सदर कार्यशाळेस उपस्थित राहावे**, याबाबत संबंधितांना आवश्यक त्या सूचना देण्यात याव्यात.

सदर कार्यशाळेसाठी संबंधित **ARC यांनी दिनांक १४ ऑगस्ट, २०२६ रोजी सकाळी १०.०० वा.** धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज सभागृह, इरावती कर्वे संकुल येथे उपस्थित राहून नोंदणी करावी. तरी, आपल्या महाविद्यालय / परिसंस्था / विभागातील संबंधित **ARC यांची सदर कार्यशाळेस उपस्थिती सुनिश्चित करावी**, ही विनंती.

**आपल्या सहकार्याबद्दल धन्यवाद.**

प्राचार्य डॉ. देविदास वायदंडे
मा. अध्यक्ष
आविष्कार संशोधन समिती २०२६–२७

प्रा. डॉ. विनायक जोशी
मा. संचालक
अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष